-: प्रेसनोट दिनांक - २७/०६/२०१९ :-

**आरोपी लोकसेवक बसवराज शांताप्पा मालगट्टी, वय ५९, सहाय्यक निदेशक ग्रेड-२, खादी व ग्रामोद्योग आयोग, भारत सरकार, महाराष्ट्र राज्य कार्यालय, मुंबई यांना ४०००/- रुपये लाच रक्कम स्विकारलेने रंगेहात पकडलेबाबत.**

---

तक्रारदार यांनी सुरू केलेल्या हर्ष आईसक्रिम फॅक्टरी करीता सन-२०१३ मध्ये बॅक ऑफ इंडिया, शाखा यवलुज, ता.पन्हाळा या शाखेमधून जिल्हा उद्योग भवनमार्फत २५% सबसीडीवर रुपये ४ लाख कर्ज घेतले होते. ते कर्ज त्यांनी सन-२०१६ मध्ये फेडले आहे. कर्ज फेड केल्यानंतर कर्ज रक्कमेच्या २५% सबसीडी शासनामार्फत म्हणजे जिल्हा उद्योग भवन येथील कार्यालयामार्फत परस्पर तक्रारदार यांचे बॅक खात्यामध्ये परस्पर जमा होणे गरजेचे होते. गेल्या वर्षी जिल्हा उद्योग भवन, कोल्हापूर मार्फत कॉन्ट्रक्टपध्दतीने फॅक्टरीचा सर्व्हे करणारे मोहन कदम यांनी तक्रारदार यांचे आईसक्रिम फॅक्टरीची पाहणी करुन त्याबाबतचा रिपोर्ट मुंबई, चर्चगेट येथील खादी ग्रामोद्योग आयोगाकडे पाठविला होता. परंतू कर्ज रक्कमेवरील सबसीडीबाबत पत्र तक्रारदार यांना अद्यापपर्यंत बॅकेमध्ये प्राप्त न झालेने ते जिल्हा उद्योग भवन, कोल्हापूर येथे चौकशीसाठी गेले असता, त्यांना कार्यालयातून सदर सबसीडी मंजूरीचे काम मुंबई, चर्चगेट येथील खादी ग्रामोद्योग आयोगाकडे प्रलंबित असलेचे सांगण्यात आले. त्याप्रमाणे ते मुंबई, चर्चगेट येथील खादी ग्रामोद्योग आयोग या कार्यालयात जावून अधिकारी मालगट्टी यांना जावून भेटले असता, त्यांनी तक्रदार यांचे फॅक्टरीचे कामासंबंधी कागदपत्रे तपासून तक्रारदार यांचे आईस्कीम फॅक्टरीचा रिपोर्ट चांगला नसलेचे सांगितले. तसेच कोल्हापूर येथे दि.२७/०६/२०१९ रोजी येणार असल्याचे सांगुन तेव्हा तक्रारदार यांची आईस्क्रीम फॅक्टरीची तपासणी करून तक्रारदार यांचे सबसिडीचे काम करुन देतो असे सांगितले.

त्याप्रमाणे आजरोजी अधिकारी मालगट्टली यांनी तक्रारदार यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क साधुन भेटण्यास सह्याद्री हॉटेल येथे भेटण्यास बोलविले होते. त्याप्रमाणे तक्रारदार हे तेथे जावुन भेटले असता अधिकारी मालगट्टी यांनी तक्रारदार यांना फॅक्टरी तपासणीचा रिपोर्ट व्यवस्थित करुन देणेसाठी रु.५,०००/- द्यावे लागतील असे म्हणुन लाचेची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार यांनी खादी ग्रामोद्योग आयोगाचे अधिकारी मालगट्टी यांचेविरुध्द आज दिनांक २७/०६/२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर कार्यालयाकडे तक्रारी अर्ज दिला.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे लागलीच शासकीय पंच साक्षीदार यांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये खादी ग्रामोद्योग आयोगाचे अधिकारी मालगट्टी यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे आईसक्रिम फॅक्टरीकरीता मंजुर कर्जावरील सबसिडी मंजुर करून देणेसाठी तडजोडीअंती ४,०००/- रूपये लाचेची मागणी केलेचे निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे खादी ग्रामोद्योग आयोगाचे अधिकारी मालगट्टी यांचेविरुध्द सापळयाचे आयोजन केले असता, अधिकारी मालगट्टी यांनी रंकाळा टॉवर परिसरातील जावळाचा गणपती मंदीरशेजारी तक्रारदार यांचेकडुन ४०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडणेत आले असून त्यांच्याविरुध्द लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे गुन्हा नोंद करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री.संदिप दिवाण पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार, श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, पोहेकॉ. मनोज खोत, पोना नवनाथ कदम, पोकॉ. मयुर देसाई, चालक पोहेकॉ. सुरज अपराध, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

१) मा.महासंचालक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे
दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३

३) श्री.आदिनाथ बुधवंत , पोलीस उपअधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर ७०८३६६८३३३.
०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक :- १०६४.

५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३